N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** लक्ष्मीपूरी **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0028 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/01/2022 13:38 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 27/12/2021
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/12/2021
   **Time From (वेळेपासून):** 12:25 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 17/01/2022 **Time (वेळ):** 13:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 029 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/01/2022 13:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे,कोल्हापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.धीरज अनिल साखळकर

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** अनिल साखळकर

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पता):**



Scanned by TapScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | एव्हरग्रीन होम,नागाळा पार्क,कोल्हापूर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | एव्हरग्रीन होम,नागाळा पार्क,कोल्हापूर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिग्वीजय पांडूरंग मर्दने | | वडील का नाम : पांडूरंग मर्दने | 1. पोक/1478,लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर,लक्ष्मीपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(**चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)**):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक- 17/01/2022 मी श्री.धीरज अनिल साखळकर, वय-37, व्यवसाय -डेव्हल्पर्स, रा. एव्हरग्रीन होम,नागाळा पार्क, जि. कोल्हापूर, मो.नं.7774064509, आज रोजी समक्ष पोलीस ठाणेत हजर राहून फिर्याद देतो की, मी एकत्रित कुटूंबियासह वरील पत्यावर राहणेस असुन मी जमिन खरेदी करून ती डेव्हलप करण्याचे काम करतो. माझी स्वतः ची जुमेरा कन्स्ट्रक्शन कंपनी असुन त्याचे माध्यमातुन माझे काम चालु असते. माझे कामाच अनुशंगाने मी श्रीमती अंजली अनिल बोंगाळे याचे फुलेवाडी येथील जमिनीची वर्ग 2 ची वर्ग 1 झालेली अशी झालेल्या आर्डरची सरकारी नक्कल रितसर मार्गाने मिळुन घेतली होती. सदर नक्कलेचा वापर जमिन मालकांचे वतीने मी मोजणी करून ले आऊट करणे वगैरे कामाकाजासाठी वापरलेली आहे.नोव्हेंबर 2021 मध्ये खोटी सरकारी कागदपत्रे तयार केलेबाबत नायब तहसीलदार श्री. लोकरे याचे फिर्यादीवरून माझ व किशोर पाटील नावाचे पोलीस याचेविरूध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, गु.र.नं. 422/2021 भादविसक 420, 465, 468, 471, 34 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयामध्ये माझा काहीएक संबंध नसुन वर नमुद नक्कलेचा वापर माझे अपरोक्ष कोणीतरी केला असुन त्या नक्कलेमध्ये अर्जदार म्हणुन माझे नाव आलेने सदर गुन्हयामध्ये मलाही आरोपी करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा तपास लक्ष्मीपूरी पोलीस ठाणच्या सपोनि श्रीमती फाळके यांचेकडे असुन गुन्हा दाखल झालपासुन वरचेवर पोलीस ठाणे येथे बोलवुन बसवुन ठेवतात. त्याप्रमाणे दि. 20/12/2021 व दि. 21/12/2021 रोजी मला त्यांनी दिवसभर पोलीस ठाणे येथे बसवुन ठेवले होते. काल दि. 23/12/2021 रोजी मी मा. न्यायालयाचे आदेशाप्रमाणे हजेरी देणेसाठी पोलीस ठाणे गेलो होतो. मी सकाळी 09.00 वा पोलीस ठाणेत हजर झालो होतो. त्यांनी मला हजर न करून घेता तसेच बसवुन ठेवले. त्यादरम्यान फाळके मडमनी मला तुझ्याविरूध्दचे गुन्हयात तुला मदत करतो, त्रास देत नाही, पण तु आम्हाला 50,000/- रू. दिले पाहिजेस, नाही दिलेस तर दिवसभर बसुन रहा आणि परत पण तुला खुप त्रास होईल असे सांगितले. फाळके मडमप्रमाणे त्यांचे मदतनीस पोलीस मर्दाने यांनी सुध्दा माझेकडे पैशाची मागणी केली. मी त्यांचेकडे विनंती करत होतो, माझी काय चुक नाही पैसे कशाबदल देवु पण त्यांनी माझे काही न ऐकता मला बसवुन ठेवले. पैसे घेतले शिवाय माझी कालची हजेरी दाखवणार नाहीत व कोर्टात माझेविरूध्द कायतर करतील, म्हणुन मी घाबरून काल दुपारचे सुमारास फाळके मडमचे मदतीस मर्दाने यांचेकडे 25,000/- नाईलाजास्तव दिले. त्यानंतर मडमनी मला हजर दाखवुन त्यांनी माझेकडील डायरीवर सही केली व त्यांनी उर्वरित 25,000/- रू. कधी घेवुन येता असे विचारले. त्यावर मी त्यांचेकडे विनंती केली दिलेत तेच कशीतरी जुळणी केली आहे अजुन कुठले आणु. त्यावर त्यांनी राहिलेले 25,000/- रू. दिलस तरच तुला मदत करणार नाहीतर असाच त्रास देणार असे सांगितले व पोलीस ठाणेमधुन निघुन गेल्या.लक्ष्मीपूरी पोलीस ठाणतील सपोनि श्रीमती फाळके व त्यांचे मदतनीस पोलीस मर्दाने हे माझेकडे मागणी करत असलेले 25,000/- रू. हे लाच म्हणुन मागणी करीत असलेची माझी खात्री झाली आहे. परंतु सपोनि श्रीमती फाळके व त्यांचे मदतनीस पोलीस मर्दाने यांना मला 25,000/- रुपये लाच रक्कम देणेची इच्छा नसलेने मी दि. 24/12/2021 रोजी अन्टी करप्षन ब्युरो, कोल्हापूर येथे समक्ष जावुन तेथील पोलीस उपअधीक्षक



Scanned by TapScanner

श्री बुधवंत साहेबांना यांना माझा वरीलप्रमाणे थोडक्यात तक्रार सांगुन त्यांचकडे लेखी तक्रारी अर्ज देवुन कारवाई करण्याची विनंती केली. मी माझे सोमवार दि. 27/12/2021 रोजी हजेरीवेळी भेटणेस जाणार असल्याने बुधवंत साहेबांनी मला दि. 27/12/2021 रोजी सकाळी 11 वाजता कार्यालयात हजर राहणेस सांगितले होते.त्याप्रमाणे दि. 27/12/2021 रोजी मी अन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात गेलो असता, डीवायएसपी बुधवंत साहेबानी यांनी माझे तक्रारीप्रमाणे कारवाई करणेसाठी दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले होते. मी तेथे गेल्यावर माझी, दोन्ही शासकीय पंच व सोबतचे सापळा पथकाशी आपसात ओळख करून दिली. त्यानंतर मला माझी तक्रार पंचांना तोंडी सांगण्याची सुचना दिली. त्याप्रमाणे मी त्यांना तक्रार सागितलेनंतर बुधवंत साहेबांनी मी दिलेला तक्रारी अर्ज त्यांना वाचणेस दिला. त्यानंतर बुधवंत साहेबांनी दोन्ही पंचांना त्यावर सही करण्यास सांगुन आपणही सही केली होती. डीवायएसपी बुधवंत साहेबानी मला व दोन्ही पंचाना लक्ष्मीपूरी पोलीस ठाणेतील महिला सपोनि फाळके मडम व त्यांचे मदतनीस पोलीस मर्दाने हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. त्यासाठी माझेसोबत पंच नं. 1 सुतार यांना माझेसोबत पाठवणार असल्याचे सांगुन त्यांनी त्यांचे कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर काढून त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड घालून मला व पंच सुतार यांना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकार्डर चालू करुन तो माझे गळयात शर्टचे आतील बाजुस अडकवून दिला व मला आणि पंच सुतार यांना माझेकडील अक्टीव्हा मोटर सायकल नंबर डभ्.09ध्म्.9928 यावरुन लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे येथे सपोनि फाळके मडम व त्यांचे मदतनीस पोलीस मर्दाने यांची भेट घेणेकरीता पाठविले. मी व पंच सुतार असे लक्ष्मीपूरी पोलीस स्टेशन येथे गेलो. त्यावेळी पोलीस मर्दाने हे बंदोबस्तासाठी टाऊन हाल येथे गेले होते. त्यामुळे मी व पंच सुतार असे टाऊन हाल येथे गेलो, तेव्हा पोलीस मर्दाने हे टाऊन हालमधुन पोलीस ठाणेस परत गेल्याचे समजले. त्यामुळे मी व पंच सुतार असे परत पोलीस ठाणेत आलो. तेथे माझी पोलीस मर्दाने यांचेशी भेट झाली भेटी दरम्यान त्यांनी माझेविरूध्द दाखल गुन्हयाचे तपासामध्ये मदत करण्यासाठी माझेकडुन यापुर्वी सपोनि फाळके मडम यांचेसाठी त्यांचे सांगण्यावरून 25,000/- रू. लाच स्विकारल्याचे मान्य करून आणखीन 10,000/- रू. लाचेची मागणी केली. त्यावेळी सपोनि फाळके मडम भीमा कोरेगांव येथे बंदोबस्तासाठी गेल्या असल्याने माझी व त्यांची भेट होवु शकली नाही. त्यानंतर मी पंच सुतार यांचेसह अन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापर या ठिकाणी परत आलो होतो. त्यावेळी बुधवंत साहेब यांचे केबीनमध्ये माझेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर बुधवंत साहेबांनी पहिल्यादा पंच सुतार यांचेकडे विचारपुस करून नतर माझेकडे विचारपुस केली, त्यावेळी मी त्यांना वरील प्रमाणे हकीकत सांगितली. त्यावेळी माझे, पंच सुतार व रेकार्डरवर रेकार्ड झालेल्या संभाषणावरून माझविरूध्द दाखल गुन्हयामध्ये मदत करणेसाठी पोलीस मर्दाने यांनी माझेकडुन सपोनि फाळके यांचेसाठी त्यांचे सांगण्यावरून यापुर्वी 25,000/- रू. लाच स्विकारल्याचे मान्य करून आणखीन 10,000/- रू. लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले.माझे तक्रारीप्रमाणे झालेल्या कारवाईबाबत मी बुधवंत साहेबांचेकडे जबाब नोंदविला असुन, सदर कारवाईमध्ये दि. 27/12/2022 रोजी लक्ष्मीपूरी पोलीस ठाणेचे पोलीस दिग्वीजय मर्दाने यांनी माझे विरूध्द दाखल गुन्हयाचे तपासामध्ये मदत करणेसाठी गुन्हयाच्या तपासी अधिकारी महिला सपोनि अंजना फाळके यांचेसाठी त्यांचे सांगण्यावरून यापुर्वी 25,000/- रूपये लाच स्विकारल्याचे मान्य करून आणखीन 10,000/- रू. लाचेची मागणी केल्याने माझी दिग्वीजय पांडूरंग मर्दाने, वय 35, पोका/1478, नेम. लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर यांचेविरूध्द फिर्याद आहे.

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): ANIL Vishnu GUJAR(I (Inspector)) / POBN55430 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned by TapScanner

14. Signature/Thumb impression of the complainant / informant. (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाव): ANIL Vishnu GUJAR
Rank (पद): I (Inspector)
No. (सं.): POBN55430



Scanned by TapScanner